*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-04, Issue-I, August 2013*

# गांधी विचारांची उपयुक्तता

**मोरे बी. व्ही.**: नुतन वसाहत, गणेश निवास,ता.अंबड, जि. जालना.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक प्रमुख नेते आणि सत्य, अहिंसा, सत्याग्रह, मानव धर्माचे पुजारी महात्मा गांधी. गांधीजी हे केवळ भारताच्या नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक अनोखे व्यक्मित्व होते. साम्राज्यवादी शक्तीविरुध्द सुरु असलेल्या स्वातंत्र्य लढ्यात सत्याग्रहाचे नवीन तंत्र वापरणारे म्हणून गांधी विख्यात झाले. महात्मा गांधीचे सत्य, अहिंसा, असहकार, सत्याग्रह हे विचार राजकारणाचे मुख्य आधार होते. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव राजकीय व्यक्तीची सामाजिक प्रतिमा सुधारण्यासाठी उपयुक्त आहे. गांधीजींनी राजकारणात पारदर्शकता निर्माण करण्यासाठी साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे धडे भावी पिढीला घालून दिले आहेत. महात्मा गांधीजींनी राजकारणाला आध्यात्माचे विशिष्ट अधिष्ठान प्राप्त करुन दिल्यामुळे राजकीय व्यक्तींच्य जीवनात नीतीमूल्यांना व्यक्तिगत व सामूहिक महत्व प्राप्त झाले.

**सत्य :**

सत्य विषयक कोणतेही चिंतन हा तत्वज्ञानाचा प्रांत आहे. महात्मा गांधीजी तत्ववेत्ते होते, त्यांचे सारे तत्वचिंतन लोकव्यवहारवादी होते. तथापि सॉक्रेटिस, प्लेटो, इमान्युएल काण्ट, रुसो, जॉन लॉक किंवा जॉन रॉल्स, रसेल ज्या अर्थाने व्यावसायिक तत्वज्ञ होते तसे गांधीजी तत्वज्ञ नव्हते. परिणामी गांधीजींना तत्ववेत्ते म्हणून अनेकांची मान्यता नसल्याने त्यांनी मांडलेल्या सत्य या संकल्पनेकडे अ‍ॅकॅडेमिशियन, व्यावसायिक विचारवेत्ते किंवा राजकीय व सामाजिक लेखन करणाऱ्यांनी म्हणावे तसे लक्ष दिलेले नाही. दुर्देवाने गांधीची चिकित्सेऐवजी श्रध्देचा विषय बनून राहिले.

भारतीय परंपरेनुसार जैन, बौध्दासह सत् हे आद्यस्वरुप सत्य आहे. गांधींना याच सत्याचा ध्यास होता. त्यांनी सत्याला ईश्वराच्या पातळीवर आणले. कारण ईश्वर ही सहजस्वीकृत बाब असते. एकदा सत्य हाच ईश्वर म्हटल्यावर त्याच्या प्राप्तीसाठी जो मार्ग अनुसरावयाचा तो सत्याग्रहाचा. इथे एक सूक्ष्म गोष्ट अधोरेखित करणे आवश्यक आहे. ती अशी की सत्य व ईश्वर या बाबी अदृश्य, अमूर्त आहेत. त्यांना मूर्तता, वास्तवता द्यावयाची तर त्यांचा रोजच्या जगण्या-तगण्याशी संबंध जोडायला पाहिजे तेच गांधी करतात.

**अहिंसा :**

अहिंसेचे त्यांचे तीन सिध्दांत होते १) हिंसेचा पुरस्कार करणाऱ्यांशी चर्चा करा. त्यांना समजावून सांगून सद्मार्गावर आणा. २) आमच्या अहिंसा आणि सहिष्णेतेलाही सीमा आहे. हे शत्रूला सांगा ३) कोणत्याही स्थितीमध्ये जनतेचा विश्वास कायम राखा. अहिंसेचा अर्थ कोणालाही न मारणे. परंतु गांधीजींसाठी याचा एवढा मर्यादित अर्थ नाही. गांधीजींची अहिंसा फार व्यापक आहे. गांधीजींच्या मते स्वार्थ, व्देष, क्रोध, अत्याचार करणे, अपमान करणे, शोषण करणे हे सर्व हिंसेमध्येच येते. अहिंसा प्राप्त करण्यासाठी साहस लागते. अहिंसा विश्वशांती आणि व्यक्तीगत जीवनासाठी महत्वपूर्ण आहे.

**सत्याग्रह :**

गांधीजींना सौजन्यता, नम्रता आणि सत्य, अहिंसा याबद्दल अतूट विश्वास होता. याच आधारावर गांधीजींनी जगाला एक नवा मार्ग दाखविला सत्याग्रहाचा. १९३० ला गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह व दांडी यात्रा काढली होती. सत्याग्रहाचा पहिला प्रयोग गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत केला. गांधीजींना सत्याग्रहाची प्रेरणा धर्म ग्रंथातून मिळाली आहे. सत्याग्रह सत्यासाठी आग्रह धरणे आहे. गांधीजींच्या मते सत्याग्रह म्हणजे आत्मशक्ति होय. सत्याग्रहांमध्ये हिंसेला कसल्याही प्रकारचे स्थान नाही.

www.ghrws.in

*Variorum Multi-Disciplinary e-Research Journal*
*Vol.,-04, Issue-I, August 2013*

**स्वदेशी :**

स्वदेशीतून राष्ट्रांअंतर्गत उद्योग धंद्यांना प्रोत्साहन देऊन राष्ट्रातील साधन संपत्तीचे योग्य नियोजन करुन मानवी श्रमाला योग्य वळण दिल्याने राष्ट्रातील गरजा राष्ट्रा अंतर्गत पूर्ण होतात. त्याच हेतूने भारताच्या विकासासाठी गांधीजींनी स्वदेशीचे समर्थन केले होते. स्वदेशी आंदोलनात आत्म-निर्भरतेचा नारा देण्यात आला होता. स्वदेशी आंदोलनाच्या माध्यमातून स्वदेशी उद्योगधंदे सुरु झाले. स्वदेशी आंदोलनाच्या प्रचाराकरिता त्या काळात विविध धार्मिक, सण, उत्सव या माध्यमातून प्रचार करण्यात आला. गांधीजी प्रत्येक परदेशी वस्तूंच्या ठाम विरोधात होते. त्यांचा एकच दृढ निश्चिय होता. स्वावलंबन ते कोणत्याही स्वरुपातील परावलंबित्वाला गुलामगिरीच मानत होते.

**खेड्याकडे चला :**

महात्मा गांधीनी खेड्यांच्या स्वयंपूर्णतेवर व स्वायत्तेवर भर दिला आहे. आज मात्र खेड्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. शहरांचा विकास होत आहे आणि खेडी मात्र भकास होत आहेत. खेड्यातील व्यक्ती आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालेला आहे. ग्रामीण जीवनाचा आधार असलेली शेती व्यवस्था पाऊसाचा लहरीपणा व सरकारचे त्याकडचे दुर्लक्ष यामुळे मोडकळीस आलेली आहे.

गांधीजींनी देशाच्या उन्नतीसाठी ग्रामव्यवस्थेला महत्वाचे स्थान दिले आहे. राज्यव्यवस्थेतील लहानातील लहान घटक ग्रामपंचायत असेल अशी खेडी स्वावलंबी राहतील अशाच काही खेड्यांचा समूह मिळून एक घटक बनेल. त्याचे कार्य ग्रामपंचायत करील. काही ग्रामसंघाचा मिळून तालुका बनेल. त्याची काम तालुका पंचायत करेल. त्यानंतर जिल्हास्तंभ असेल. शहरांसाठी माग मुन्सिपल संघ असतील सहकार्य हा यातील महत्वाचा आधार असेल. गावातील लोक शांतीपूर्ण जीवन व्यतीत करतील तसेच अहिंसात्मक समाजाची स्थापना गावातच शक्य आहे. गावातील पंचायत तेथील प्रशासन पाहिल.

व्यक्ती स्वत:वर नियंत्रण ठेवील. सर्व आवश्यकतांची पूर्ती करण्याची साधने ग्रामपंचायती जवळ राहतील. गांधीजींच्या आदर्श समाज रचनेत व्यक्ती केंद्रबिंदू राहील. गावातील कायदा न्याय व शासनविषयक सत्ता ग्रांमपंचायतीकडे राहील. त्यामुळे समाजात समता राहील खेडी स्वायत्त बनतील. आपला देश हा कृषिप्रधान असून तो अनेक खेड्यापाड्यांनी बनलेला आहे. हे वास्तव गांधीजींच्य आर्थिक विचारांचे मुख्य सुत्र होय. देशाला आर्थिक स्वावलंबी बनवायचे असेल तर खेडे हा घटक केंद्रबिंदू मानला पाहिजे.

**निष्कर्ष :**

गांधींना प्राचीन ग्रामराज्य महत्वाची वाटत होती. ही ग्रामराज्य लोकशाही पध्दतीची होती या ग्रामराज्य पध्दतीत पंचांच्या एकमताने निर्णय होत असे. ही ग्रामराज्य म्हणजे अहिंसात्मक लोकशाहीच होती. आजच्या परिस्थितीत स्वदेशी, यंत्रविवेक, ग्रामोद्योग, अहिंसा, नैतिकता या विचारांची प्रेरणा घेऊन कार्य करण्याची गरज निर्माण झालेली आहे. तरच संबंध मानव जातीचे भवितव्य उज्ज्वल राहील.

**संदर्भ :**

१) गांधीजी के आदर्श और उपयोगिता, प्रेम कुमार शर्मा, राजा पॉकेट बुक्स प्रकाशन – २०११.
२) शमाज प्रबोधन पत्रिका, सुहास पळशीकर, मोहन प्रिंटींग प्रेस, जून – १९९६.
३) हिंद स्वराज, गांधीजी, नवजीवन प्रकाशन, १९४९.

www.ghrws.in